वाचले-

१)अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग- गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल मंत्रालय मुंबई ४००००१ दि.१४ मार्च २०२० क्र करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

४)वैद्यकिय विभाग यांचेकडील आदेश क्र. वैद्य/९/कावि/२९४०/२०२० दिनांक १३/०६/२०२०

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ह क्षेत्रीय कार्यालय कासारवाडी
जा क्र हक्षेका/वॉररुम/कावि/१४८/२०२०
दिनांक २४/०८/२०२०

विषय :- कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रणा बाबत...

आदेश,

ज्या अर्थी कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या Covid-19 या संसर्गजन्य आजारामुळे पिंपरी चिंचवड शहरात आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली आहे.

ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटना तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय- भारत सरकार यांनी या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव प्रस्तावित केलेल्या विविध उपाय योजनांची अंमलबजावणी या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात आपत्कालीन उपाययोजना लागू करण्याची व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील कोरोना विषाणू बाधित रुग्णांची संख्या विचारात घेता येत्या काळात पिंपरी चिंचवड शहरात रुणांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शहरातील नागरीकांचे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने शहरातील काही भागांमध्ये पुढील काही दिवस नागरिकांच्या हालचालींवर- बाहेर फिरणाऱ्यावर मर्यादा आणणे आवश्यक झाले आहे.

ज्याअर्थी- अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग- मंत्रालय- मुंबई ४००००१ दि.१४ मार्च २०२० क्र करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ "महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम-२०२०" नुसार एखादया भौगोलिक क्षेत्र उदाहरणार्थ गाव- तालुका- वॉर्ड कॉलनी इत्यादी मध्ये कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव/उद्रेक आढळयास अशा उद्रेकजन्य क्षेत्राबाबत खाली नमूद केलेल्या तसेच प्रसंगानुसार आवश्यक असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त समक्ष प्राधिकारी असतील. मा.आयुक्तसो यांचेकडील वाचले क्र. ४ अन्वये कोविड-१९ रुग्ण परीसरात कन्टेटंमेंट झोन तयार करणेची कार्यवाही रग्ण ज्या क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामधील रहीवासी असेल तेथील श्रेत्रीय अधिकारी,जेष्ठ/प्रभारी वैद्यिकय अधिकारी रुग्णालय सहा. आरोग्य अधिकारी व पोलीस अधिकारी यांचेवर निश्चित करणेबाबत सूचना केलेल्या आहेत.अशा भौगलिक क्षेत्रांच्या बाबतीत क्र.१० मधील

अ)क्षेत्र प्रतिबंधित करणे

ब) क्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधित करणे

क)क्षेत्रातून वाहनांचे आवागमन प्रतिबंधित करणे

तसेच भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा- २००५ प्रमाणे संभाव्य होणाऱ्या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मानवी आरोग्याला व जीविताला धोका निर्माण होण्याचा संभव आहे. याकरीता कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे आदेश लागू करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

सबब संदर्भिय क्र.४ चे आदेशान्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ (एपिडमिक ऍक्ट) मधील तरतुदींनुसार- पिंपरी चिंचवड शहरातील ह क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामधील खालील नमुद परिसर सील करणे आवश्यक आहे. कोविड -१९ चा वेगाने होणारा प्रसार रोखण्यासाठी व संभाव्य सामुदायीक प्रसार (Community Transfer) टाळण्यासाठी शहरातील नागरिकांच्या हालचालीवर, बाहेर फिरण्यावर मर्यादा आणण्याकरीता खालील नमुद परिसर हा Cluster Containment Zone म्हणून घोषित करण्यात येत आहे

| अ.क्र. | वार्ड क्र. | कंटेन्टमेंट झोन चे नाव | कंटेन्टमेंट झोनचा परिसर |
|---|---|---|---|
| 1 | 30 | राधिका रेसिडन्सी, फुगेवाडी-१२ | राधिका रेसिडन्सी, रिध्दी-सिध्दी ग्रुप, कुणालपुरम, अग्रसेननगर सोसायटी, पुणेमुंबई रस्ता फुगेवाडी परीसर |

तरी उपरोक्त सीमाभागामधील कंटेनमेंट झोन येथील सर्व संबंधित पोलिस ठाण्यांच्या अंकित असलेला- सोबतच्या नकाशात दर्शविलेला कंटेनमेंट परिसर (परिशिष्ठ १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ) आज सोमवार दिनांक २४ ऑगस्ट २०२० रोजी रात्री ११.०० वाजलेपासून पुढील आदेशापर्यंत सदर परिसरातील संबंधित पोलिस स्टेशन प्रमुख यांचे मार्फत सील करणे आवश्यक आहे. तसेच सदर कंटेनमेंट परिसरांच्या हद्दींमध्ये पुढील आदेशापर्यंत प्रवेशबंदी व परिसरातून बाहेर पडण्यास नागरिकांना बंदी आहे. सील केलेल्या परिसरातील प्रत्येक नागरिकाने तोंडाला मास्क लावणे बंधनकारक आहे.

तथापि-

१)सदर आदेशान्वये कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काम करणारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कर्मचारी व वाहने तसेच शासकीय व सेवा देण्यात येणाऱ्या वाहनांना सदरच्या आदेशानुसार कंटेनमेंट झोन व बफर झोन कार्यवाहीमधून वगळण्यात यावे.

२)उपरोक्त नमुद कंटेनमेंट झोन क्षेत्रातील नागरिकांच्या बँकींग सुविधांसाठी सर्व बँकांनी शाखा बंद ठेवाव्यात व केवळ आपली ए.टी.एम.केंद्रे कार्यान्वीत ठेवावीत.

३)वैद्यकिय विभागामार्फत सर्व क्षेत्रिय कर्मचारी यांनी उपरोक्त नमुद कंटेनमेंट झोन व बफर झोन येथे राज्य शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार ILI/SARI/६० वर्षाच्या वरील/ असंसर्गजन्य व दुर्धर आजारांनी ग्रस्त व्यक्तींचे सर्वेक्षण दररोज करावे.

तसेच पुढील काळात शहरातील रुग्णांची संख्या विचारात घेता टप्प्याटप्प्याने शहरातील इतर भागांत देखील या प्रकारचे निर्बंध लागू करण्याबाबत आवश्यकतेनुसार निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे नागरिकांनी किमान सात दिवसांसाठी लागणारे जीवनाश्यक साहित्य गर्दी न करता प्राप्त करुन घेऊन पूर्वतयारी करावी असे आवाहन करण्यात येत आहे.

त्याअर्थी उपरोक्त परीसरात वावर असणा-या नागरीकांचे व्यापक हित, आरोग्य विचारात घेऊ कोविड-19 आजाराचा प्रसार रोखण्याकरीता साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ नियम व दिनांक १३/०६/२०२० च्या मा. आयुक्त यांचे प्राप्त आदेशान्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी ह क्षेत्रीय कार्यालय याद्वारे नमूद परीसर हा कंटेन्टमेंट झोन Containtment Zone म्हणून घोषित करीत आहे.

हा आदेश आज दिनांक – दिनांक २४ ऑगस्ट २०२० रोजी माझ्या सही शिक्क्याने दिला आहे.

सहा. आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी
ह क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी-४११ ०३४

सोबत: - परिशिष्ठ १ (नकाशात दर्शविलेला परिसर)

प्रत माहितीस्तव सादर -

१. मा. विभागीय आयुक्त,विभागीय आयुक्त कार्यालय- पुणे
२. मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण- जिल्हा पुणे
३. मा. आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका
४. मा. पोलीस आयुक्त- पोलीस आयुक्त कार्यालय पिंपरी चिंचवड यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित
५.मध्यवर्ती नियंत्रण कक्ष (WAR ROOM) पिं.चि मनपा
६. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक- पुणे
७. संबधित प्रभारी वैद्यकिय अधिकारी- रुग्णालय झोन
८. वरिष्ठ पोलीस निरिक्षक सांगवी/भोसरी/भोसरी एम.आय.डी.स./पिंपरी पोलीस स्टेशन .